# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.10.2025** **वार- बुधवार**

---

**<u>नीती आयोग</u>**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उत्पादन अभियानाच्या धर्तीवर राज्य शासनही 'राज्य उत्पादन अभियान' सुरू करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नीती आयोगाच्या वतीनं पुण्यात आयोजित केलेल्या परिषदेत केली. महाराष्ट्र प्रगत उत्पादन क्षेत्राचं नेतृत्व करेल आणि पुणे–मुंबई क्वांटम कॉरिडॉर तयार करण्याचा राज्य शासनांचा निश्चय आहे, अशी ग्वाही देखील फडणवीस यांनी दिली. नीती आयोगाप्रमाणे महाराष्ट्रात स्वतंत्र संशोधन आणि धोरण संस्था स्थापन होणार असल्याचंही फडणवीस यांनी जाहीर केलं.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम तसंच उद्योगांचे प्रतिनिधी प्रामुख्यानं उपस्थित होते.

बी. व्ही. आर. सुब्रमण्यम म्हणाले की, उत्पादन क्षेत्राला वगळून कोणताही देश विकसित होऊ शकत नाही. जगात या क्षेत्रात खूप बदल होत आहेत. हे होत असताना नव्या संधीदेखील आपल्यासाठी निर्माण होतात. देशात राज्यांच्या घरगुती उत्पादनात महाराष्ट्र पुढे आहे. मात्र कायम पुढे राहण्यासाठी निरंतर काम करावे लागते. उत्पादन क्षेत्रात पुण्याचे महत्व मोठे आहे. मागील अंदाजपत्रकात 'राष्ट्रीय उत्पादन

अभियान’ सुरू करण्याचे घोषित केले होते. त्या अनुषंगाने काम चालू असून लवकरच प्रत्यक्षात हे अभियान सुरू करण्यात येईल. इतर प्रगत देशांनी ज्याप्रमाणे उत्पादन क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले त्याचप्रमाणे आपल्या देशातही आणण्यावर यात भर देण्यात येणार आहे असं सुब्रमण्यम यांनी सांगितलं.

महिंद्रा समूहाच्या रुचा नानावटी यांनी या राष्ट्रीय उत्पादन अभियानाच्या अनुषंगानं सुरू असलेल्या कामाची माहिती दिली. उत्कृष्ट कृती दल स्थापन करून प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देणे, संशोधन आणि विकास क्षेत्रावर भर देण्यात येणार असून त्याचबरोबरीनं भारताचं एआय मिशन आदी भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी असेल, असंही त्या म्हणाल्या.

**<u>पुणे ग्रँड टूर</u>**

पुणे ग्रँड टूर ही केवळ स्पर्धा नाही, तर पुण्याला नवी ओळख देणारी आणि अर्थव्यवस्थेला चालना देणारी स्पर्धा आहे, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. ‘पुणे ग्रँड टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या लेव्हल २.२ स्टेज शर्यतीचं बोधचिन्ह आणि जर्सीचं अनावरण मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्य मंत्री रक्षा खडसे यांच्या उपस्थितीत करण्यात आलं. या स्पर्धेतून अंदाजे साडेआठशे कोटी रुपयांचा महसूल राज्य शासनाला मिळणार असल्याचं पवार यांनी यावेळी सांगितलं. या स्पर्धेत १८ देशांचे ३४ संघ सहभागी होणार आहेत.

**<u>पिंपरी चिंचवड-सीमा</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेची स्थायी समिती बैठक आज पार पडली. या बैठकीत विविध विकास कामं, वाहन खरेदी, महिला बचत गटांसाठी जेटिंग मशीन खरेदी करणे, संगणक दुरुस्तीला मुदतवाढ देणे आणि यासह अन्य विषयांना मान्यता देण्यात आली. आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र विभाग,  आणि विविध संस्थांच्या सहयोगानं ठाणे जिल्हा आणि सभोवतालच्या भागातील शेतकरी तसंच आदिवासी बांधवांसाठी परवा ३१ ऑक्टोबरला 'औषधी वनस्पतींसंबंधी विविध विषयावर मीरा-भायंदर इथं एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.  कार्यशाळेमध्ये दुर्मिळ आणि देशी औषधी वनस्पतींची ओळख त्यांचे महत्व, औषधी वनस्पती लागवड आणि संवर्धन, काढणीपश्चात यंत्रणा, कच्चा माल प्रक्रिया आणि त्यापासून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी, बाजारपेठ उपलब्धता, त्यासाठी मिळणाऱ्या विविध योजना, इत्यादिविषयी सखोल माहिती प्रात्यक्षिकासह या कार्यशाळेत देण्यात येणार आहे. शेतकरी, संशोधक आणि उद्योजक यांनी कार्यशाळेमध्ये नोंदणी करून सहभागी घ्यावा असं आवाहन त्तन वनौषधी संशोधन संस्थेच्या प्रमुख संशोधकांनी केले आहे.

**अपघात**

पुण्यातील नवले पुलाजवळ पहाटे एका ट्रक चालकाच नियंत्रण सुटल्यामुळं त्यानं तीन वाहनांना जोरदार धडक दिली. या अपघातात दोन वाहनचालक किरकोळ जखमी झाले असून तीनही वाहनांचं मोठं नुकसान झाल आहे. घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ ट्रक चालकाला ताब्यात घेतलं. यामुळं काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

**फसवणूक**

पुण्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेशाच्या आमिषानं २१ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनं एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपीनं सात ते आठ पालकांची फसवणूक केल्याची माहिती प्राथमिक तपासात मिळाली आहे. नामवंत महाविद्यालयात प्रवेश मिळवून देतो असं अमिष दाखवून या आरोपीनं पैसे उकळल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज हलका पाऊस पडला. कमाल तापमान ३१ तर किमान तापमान २० पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**